पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १४

**सभावृत्तांत**

दिनांक – १८/०६/२०२१ वेळ - दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक १८/०६/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील मा.सभापती, विधी समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/ २०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि. ३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे काही सन्मा.सदस मा.सभापती, विधी समिती यांचे दालनात तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

१. **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे - सभापती**
२. मा.वसंत प्रभाकर बोराटे
३. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
४. मा.सुजाता सुनिल पालांडे
५. मा.गोफणे अनुराधा देविदास
६. मा.सुलक्षणा राजू धर
७. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
८. मा.अमित राजेंद्र गावडे

या शिवाय मा.अरुण जागडे – प्र.कार्यालय अधिक्षक, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.२) जेष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीस मान्यता देणेबाबत.

----------

दिनांक **०४/०६/२०२१** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १३)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**----------**

ठराव क्रमांक - ३९ विषय क्रमांक - ०१

दिनांक - १८/०६/२०२१ विभाग – ड क्षेत्रीय विद्युत

सुचक : मा.संगिता भोंडवे अनुमोदक : मा.सुजाता पालांडे

संदर्भ : मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचे पत्र क्र.डक्षे/वि/वाकड/१३८/२०२१, दि.२०/०५/२०२१

मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांनी शिफारस केलेप्रमाणे -

काळेवाडी फाटा येथे वाकड कस्पटेवस्ती ते पिंपरी (काळेवाडी) ग्रेड सेपरेटर बांधणे या प्रकल्पाकरीताचे स्थापत्य विषयक कामे अद्यापही सुरू झालेले नसल्याने, सदर प्रकल्पासाठी विद्युत विषयक कामे करणे सद्यस्थितीत शक्य होत नाहीत. काळेवाडी फाटा येथे वाकड कस्पटेवस्ती ते पिंपरी (काळेवाडी) ग्रेड सेपरेटर बांधणे या प्रकल्पाकरीताचे विद्युत विषयक कामे करणेचे स्विकृत नि.र.रू.१,५०,७१,५२६/- (अक्षरी र.रु.एक कोटी पन्नास लाख एक्काहत्तर हजार पाचशे सव्वीस फक्त) चे कामाचे आदेश एजन्सी मे.श्री ओम इलेक्ट्रीकल्स यांना दि.०१/०३/२०१९ रोजी देण्यात आले आहेत. एजन्सीने सदर कामाकरीता वापरावयाचे एचटी केबल, आरएमयु, एलईडी फिटींग, एलटी केबल व पाईपचा पुरवठा केलेला असुन या कामाचे कमाल खर्च मर्यादेनुसार र.रू.७२,२४,७५९/- इतकी रक्कम शिल्लक आहे. सदर प्रकल्पाकरीता आवश्यक जागा अद्यापही न्यायप्रविष्ठ असल्याने सदरच्या प्रकल्पाचे स्थापत्य कामे सुरू करणेचा कालावधी निश्चित करणे शक्य होत नसल्याचा बीआरटीएस स्थापत्य विभागाकडुन अभिप्राय प्राप्त झालेला आहे. त्यामुळे सदर प्रकल्पासाठी आवश्यक विद्युत विषयक कामे करणे सद्यस्थितीत शक्य होत नाहीत. या प्रभागाचे स्थानिक मा.नगरसदस्य यांनी याच प्रभाग क्र.२६ मधील कस्पटेवस्ती स्मशान भूमी जवळील पुणे मनपा मार्फत उभारण्यात येत असलेल्या नदीवरील पुलाचे बांधकामात पिंचिंमनपा हद्दीतील अडथळा करणारे तसेच बीआरटीएस रस्त्यावरील कस्पटे चौक ते वाकड चौक या रस्त्यावरील फुटपाथमधील उच्चदाब विजवाहिन्यांमुळे अपघात होऊन नागरिकांचे जिवीतांस धोका होण्याची शक्यता असल्याने त्वरित भुमिगत करणेकामी विनंती केली आहे. त्याचप्रमाणे प्रभाग क्र. २६ मधील नाशिक फाटा ते वाकड बीआरटीएस या रस्त्यावरील दिव्यांच्या नादुरूस्त केबल बदलणे तसेच काळेवाडी फाटा येथाल ब्रिज करीताच्या नादुरूस्त एल ई डी फिटींग बदलणे अत्यावश्यक आहे. सदरची कामे उपरोक्त विषयांकीत कामातून करून घेणे शक्य होणार आहे. उपरोक्त नमूद प्रमाणे सदरची कामे विषयांकीत कामातून करून घेतल्यास होणारा खर्च हा या कामाचे कमाल खर्च मर्यादेतच होणार आहे. सबब उपरोक्त नमूद कामे करणे करीता विषयांकीत कामाचे स्थळबदलास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४० विषय क्रमांक - ०२
दिनांक - ०४/०६/२०२१ विभाग – प्रशासन
सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.वसंत बोराटे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/२/कावि/५५१/२०२१, दि.०७/०६/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवडमहानगरपालिका आस्थापनेवर **'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी'** अभिनामाची १६ पदे **S-२३ वेतनश्रेणी र.रु ६७७००-२०८७००** मध्ये शासन मंजूर असून४ पदे रिक्त आहेत. **'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी'** अभिनामाची रिक्त पदेपदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्तसो यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक ३१/०५/२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व **'वैद्यकीय अधिकारी'** पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्च,संगणक अर्हता आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवाविषयक तपशिल पडताळून, खालील **वैद्यकीय अधिकारी गट – ब** यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबितअसलेलीविशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिनव व शासन निर्णय दि.७/०५/२०२१ चे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार **'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी'** पदावर **S-२३ वेतनश्रेणी र.रु ६७७०० -**

**२०८७००** या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार तसेच मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.

| **अ.क्र** | **दि.०१/०१/२०२० रोजीच्या सेवाज्येष्ठता यादीतील क्रमांक** | **वैद्यकीय अधिकारी नावं** | **पदोन्नतीचा प्रवर्ग** |
|---|---|---|---|
| १ | १४ | डॉ.मंडपे रविंद्र नारायण | ज्येष्ठतेनुसार |
| २ | १५ | डॉ.अलवी सय्यद नासेर इब्राहीम | ज्येष्ठतेनुसार |
| ३ | १७ | डॉ.ढगे शिवाजी त्रिंबकराव | ज्येष्ठतेनुसार |

सबब, उपरोक्त **वैद्यकीय अधिकारी** यांना **S-२३ वेतनश्रेणी र.रु ६७७०० – २०८७००** मध्ये **'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी'** पदावर, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन व शासन निर्णय दिनांक ०७/०५/२०२१ चे अधिन राहून सेवाज्येष्ठतेनुसार रिक्त जागेवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(स्वीनल कपिल म्हेत्रे )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३०८/२०२१
दिनांक : १८/०६/२०२१

**(अरुण हरिभाऊ जागडे)**
प्र.कार्यालय अधिक्षक
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.